**प्रेसनोट** दि.०५/०३/२०१९

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे**

**"महिलेची हरवलेली पर्स पोलिसांनी परत दिली....!"**

दत्तवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी क्षीरसागर यांना वारजे माळवाडी येथे अण्णासाहेब धर्माधिकारी यांच्या सार्वजनिक निरुपणाच्या कार्यक्रमाचा बंदोबस्त होता. त्याकरिता इतर पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बरोबर तेआलेल्या गर्दीला नियंत्रित करण्याचा बंदोबस्त करत असताना , त्यांना गर्दीत एक बॅग सापडली व त्या मध्ये मोबाईल होता. सदर मोबाईल मधील इतर नंबर तपासून संबंधित मोबाईल धारकाचा शोध घेतला असता ,त्या मोबाईलच्या श्रीमती.वैशाली चेतन पिसाळ ,रा.चिंतामणी नगर , बिबवेवाडी,पुणे ह्या मालक असल्याचे समजले व त्याप्रमाणे संपर्क करून ,त्यांची पर्स व मोबाईल पुन्हा ताब्यात दिला आहे. त्यावेळेस श्रीमती.वैशाली पिसाळ यांनी पोलीस विभागाचे आभार मानले.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर

